CON 1013

# MAHARASHTRA NURSING COUNCIL, MUMBAI

## EXAMINATION IN AUXILIARY NURSING AND MIDWIFERY

## SECOND YEAR (NEW COURSE)–PAPER–I

## MIDWIFERY

MONDAY, 19TH DECEMBER 2016

[ TIME : 2-00 P.M. TO 5-00 P.M. ]

(TOTAL MARKS – 75)

---

1. The Candidate must write her / his Seat Number in **ENGLISH.**
2. Please note that the question paper set in **ENGLISH** version is final for any doubt in **MARATHI** Paper.

---

**Marks**

1. (A) Select the appropriate answer from the following :— (05)

(1) In active management of third stage of labour, which uterogenic agent should be used ? .................... .

(*a*) Inj. Methargine 2 mg (*b*) Inj. Oxytocine/Tab Misoprostol

(*c*) Tab Drotin (*d*) Inj. $Mgso_4$.

(2) A simplified partograph provides information on .................. .

(*a*) Pelvic adequacy

(*b*) Foetal and maternal well being and progress of labour

(*c*) Medicines given to mother and child

(*d*) Station of the head.

(3) Which of the following is essential for every pregnant woman ? ............. .

(*a*) Two doses of Inj.T.T.

(*b*) Early registration and four ANC check-ups

(*c*) 100 IFA tablets (*d*) All of these.

(4) Which of the following drug should be given to the mother infected with HIV of her baby after birth ? .................. .

(*a*) Nevirapin (*b*) Zudovidin

(*c*) Rifampicin (*d*) Acyclovir.

(5) Colour of normal amniotic fluid is ............... .

(*a*) Yellowish (*b*) Greenish

(*c*) Golden (*d*) Dark brown.

(B) Match the following :— (05)

| 'A' Group | 'B' Group |
|---|---|
| (1) HCG (Human Chorionic Gonadotrophin) | (*a*) Zero station |
| (2) Level of Ischial Spines | (*b*) Ante Partum Haemorrhage |
| (3) Vesicular mole | (*c*) Prevention of infection |
| (4) Placenta previa | (*d*) Pregnancy (normal) |
| (5) Perineal wash | (*e*) Choriocarcinoma. |

[Turn over

Marks

(C) State ***true*** or ***false*** :— (05)

(1) The fundal height indicates the progress of pregnancy and foetal growth.

(2) Constipation and passes of dark stool indicate that the IFA tablets should be stopped.

(3) A woman should gain 9 to 11 kg. weight throughout her pregnancy.

(4) Oligohydramnious is defined as excessive aminiotic fluid.

(5) An important element of essential care of the newborn is to maintain clear airway and breathing.

2. Write short notes (any ***three***) :— (15)

(*a*) Diet of pregnant woman (*b*) Functions of placenta

(*c*) M.T.P. (*d*) Bregma (anterior fontanelle).

3. Give Scientific reasons :— (15)

(*a*) A pregnant woman with 36-38 wks. gestation has difficulty in breathing.

(*b*) Physiological oedema on legs is generally present in pregnancy.

(*c*) Many pregnant women have morning sickness during first trimester.

(*d*) Second/boosterdose of Inj. T.T. must be given at least 4 wks. prior to delivery.

(*e*) Biomedical waste generated in labour room must be disposed as per recomendations of law.

4. Answer the following questions :—

(*a*) Write objectives of Antenatal care. (03)

(*b*) What information will you collect from pregnant woman at first visit ? (05)

(*c*) What care/services are provided in A.N.C. clinic ? (03)

(*d*) What health education will you give to pregnant woman ? (04)

***OR***

(*a*) Define vesicular mole and write causes of vesicular mole. (03)

(*b*) What are the signs and symptoms of vesicular mole ? (04)

(*c*) How will you diagnose this condition ? (03)

(*d*) Write management and complications of vesicular mole. (05)

5. Answer the following questions :—

(*a*) Define puerperial sepsis and write the types of it. (03)

(*b*) Which are the causative organisms and predisposing factors of puerperial sepsis ? (03)

(*c*) Describe the signs and symptoms of puerperial sepsis. (04)

(*d*) How will you manage such patients ? (05)

***OR***

(*a*) What is breech presentation ? (02)

(*b*) Write the types of breech presentation. (03)

(*c*) What are the causes and how will you diagnose breech presentation ? (05)

(*d*) Write obstetric management of breech presentation. (05)

# महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई

**ऑक्झीलिअरी नर्सिंग आणि मिडवायफरी**

**द्वितीय वर्ष परीक्षा (नवीन अभ्यासक्रम) पेपर-१**

**मिडवायफरी**

सोमवार, दिनांक १९ डिसेंबर २०१६

[ **वेळ** : दुपारी २-०० ते सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत ]

(एकूण गुण — ७५)

---

१. उमेदवाराने तिचा / त्याचा आसन क्रमांक **इंग्रजी**मध्ये लिहावा.

२. **मराठी** भाषेतील भाषांतरातील अडचणीसाठी **इंग्रजी** भाषेतील प्रश्नपत्रिका अंतिम राहील.

---

**गुण**

१. (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा :— (०५)

(१) प्रसूतीच्या तिसऱ्या अवस्थेतील व्यवस्थापनासाठी गर्भाशयावर परिणाम करणारे कोणते औषध प्राधान्याने वापरतात ? ................... .

(अ) इंजेक्शन मेथारजीन २ मि.ग्रॅ. (ब) इंजेक्शन ऑक्सीटोसीन/टॅबलेट मिझोप्रोस्टॉल.

(क) टॅबलेट ड्रोटीन (ड) इंजेक्शन मॅग्नेशियम सल्फेट.

(२) सिम्प्लिफाईड पार्टोग्राफमुळे खालील माहिती मिळते.—

(अ) कटिराची परिपूर्णता (ब) गर्भाची व मातेची स्थिती व प्रसूतीमधील प्रगती.

(क) मातेला व बाळाला दिलेली औषधे.

(ड) गर्भमस्तकाचे स्टेशन.

(३) गर्भवती मातेसाठी खालीलपैकी काय आवश्यक आहे ? ................... .

(अ) इंजेक्शन टी.टी.चे दोन डोसेस

(ब) लवकर नोंदणी व गर्भावस्थेतील ४ भेटी

(क) १०० लोहयुक्त गोळ्या (ड) यापैकी सर्व.

(४) एच.आय.व्ही बाधित मातेस व जन्मानंतर तिच्या नवजात बाळास खालीलपैकी कोणते औषध देतात ? ................... .

(अ) नेव्हिरॅपीन (ब) झुडोव्हिडीन

(क) रिफाम्पिसिन (ड) एसायक्लोवीर.

(५) स्वाभाविक गर्भोदकाचा रंग खालीलपैकी कोणता असतो ? ................... .

(अ) पिवळसर (ब) हिरवट

(क) सोनेरी (ड) गडद तपकिरी.

(ब) योग्य जोड्या जुळवा :— (०५)

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (१) एच.सी.जी (ह्युमनकोरियॉनिक गोनॅडोट्रॉफीन) | (अ) झिरो स्टेशन |
| (२) इच्छियल स्पाईनची पातळी | (ब) प्रसवपूर्व रक्तस्त्राव |
| (३) व्हेसीक्युलर मोल | (क) जंतूसंसर्गास प्रतिबंध |
| (४) प्लासेंटा प्रिव्हिया | (ड) स्वाभाविक गर्भावस्था |
| (५) पेरिनियल वॉश | (इ) कोरियोकार्सिनोमा. |

[ उलटून पहा

(क) खालील विधाने **चूक** की **बरोबर** ते लिहा :— (०५)

(१) गर्भावस्थेत गर्भाशयाच्या उंचीवरून गर्भावस्थेची प्रगती व गर्भाची वाढ समजते.

(२) गर्भवती मातेला बद्धकोष्ठता किंवा काळपट रंगाची शौचास झाल्यास तिच्या लोहयुक्त गोळ्या बंद कराव्यात.

(३) संपूर्ण गर्भावस्थेत मातेचे वजन ९ ते ११ कि.ग्रॅ. वाढले पाहिजे.

(४) ऑलिगोहायड्रामिनस म्हणजे गर्भोदकाचे प्रमाण जास्त असणे.

(५) जन्मताच बाळाची काळजी घेताना त्याचा श्वसनमार्ग मोकळा करणे व श्वसन स्वाभाविक होऊ देणे ही महत्त्वाची बाब आहे.

२. टिपा लिहा (कोणत्याही **तीन**) :— (१५)

(अ) गर्भवती मातेचा आहार (ब) प्लासेंटाची कार्ये

(क) एम.टी.पी. (ड) ब्रेग्मा (पुढील टाळू).

३. शास्त्रीय कारणे लिहा :— (१५)

(अ) ३६-३८ आठवड्याच्या गर्भवती मातेला श्वसनास त्रास होतो.

(ब) सर्वसाधारणपणे गर्भवती मातेच्या पायांवर फिजियॉलॉजीकल सूज असते.

(क) गर्भावस्थेच्या पहिल्या तिमाहीत बहुतांश मातांना मॉर्निंग सिकनेस असतो.

(ड) इंजेक्शन टी.टी. चा दुसरा/बूस्टर डोस प्रसूतीपूर्वी किमान चार आठवडे देणे आवश्यक असते.

(इ) प्रसूती कक्षात निर्माण होणाऱ्या जैविक वैद्यकीय कचऱ्याचे व्यवस्थापन कायद्यातील तरतुदीनुसार केलेच पाहिजे.

४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) प्रसवपूर्व जतनाची उद्दिष्ट्ये लिहा. (०३)

(ब) गर्भवती मातेच्या प्रथमभेटीत तिच्याबाबत कोणकोणती माहिती मिळवाल ? (०५)

(क) प्रसवपूर्व क्लिनिकमध्ये कोणकोणती काळजी घ्याल किंवा सेवा द्याल ? (०३)

(ड) गर्भवती मातांना काय आरोग्यशिक्षण द्याल ? (०४)

**किंवा**

(अ) द्राक्षगर्भाची व्याख्या लिहा व त्याची कारणे लिहा. (०३)

(ब) द्राक्षगर्भाची चिन्हलक्षणे लिहा. (०४)

(क) ह्या अवस्थेचे निदान कसे कराल ? (०३)

(ड) द्राक्षगर्भाच्या रुग्णाचे व्यवस्थापन व विपरीत परिणाम लिहा. (०५)

५. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) सूतिकादोषाची व्याख्या आणि त्याचे प्रकार लिहा. (०३)

(ब) सूतिकादोष होण्यास कारणीभूत जंतूंविषयी आणि साहाय्यभूत कारणाविषयी लिहा. (०३)

(क) सूतिकादोषाची चिन्ह लक्षणे वर्णन करा. (०४)

(ड) अशा रुग्णांचे व्यवस्थापन कसे कराल ? (०५)

**किंवा**

(अ) कटिरदर्शन म्हणजे काय ? (०२)

(ब) कटिरदर्शनाचे प्रकार लिहा. (०३)

(क) कटिरदर्शनाची कारणे लिहून त्याचे निदान कसे कराल ते लिहा. (०५)

(ड) कटिरदर्शनाच्या मातेचे प्रसूती व्यवस्थापन कसे कराल ? (०५)